# उंबरठ्याच्या बाहेर

उंबरठ्याच्या बाहेर बघ,
सुरेख रेखीव रांगोळी
उंबरठ्याच्या आत घरात,
तुझी माझी आळी-मिळी

उंबरठ्याच्या बाहेर,
मोकळी हवा, सोनेरी उन
उंबरठ्याच्या आत घरात,
तुझी माझी उदास धून

उंबरठ्याच्या बाहेर,
सात डोंगर, सात समुद्र
उंबरठ्याच्या आत आपण,
कोते मन, विचार क्षुद्र

आपणच उभारलेल्या,
भिंती आपल्याभवती.
उंबरठ्याच्या लक्ष्मण रेषा
रंग, लिंग, जाती-पाती...

उंबरठ्याच्या आत आपण
अडकलेले आपल्याच पिंजऱ्यात
उंबरठ्याच्या बाहेर निसर्ग,
ब्रम्हांड सामावून बाहुपाशात

© प्रीती देशपांडे